# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, ४था मजला,
विधानभवनसमोर, पुणे - ४११ ००१
दि. - २६/०८ /२०२५

विकास भीमराव गायकवाड

तक्रारदार

अर्जदार यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचेकडे आयोगाच्या कार्यक्षेत्रातील वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या विरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत एकूण २३ तक्रारी (सोबतच्या सहपत्रातील यादीनुसार) दाखल केल्या आहेत.

अर्जदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल केलेल्या सर्व तक्रारींची तपशीलवार तपासणी करण्यात आली असता या तपासणीत खालील बाबी आयोगाच्या निदर्शनास आल्या आहेत.

१. अर्जदार यांनी या तक्रारी दाखल करताना, आयोगाच्या आदेशानुसार अनुपालन अहवाल सादर केला नाही, माहिती दिली नाही, समाधानी नाही, दिशाभूल करणारी माहिती दिली इ. प्रयोजने नमूद केली आहेत.

२. अर्जदार यांनी दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता अर्जदार यांनी या तक्रारीशी सबंधीत जन माहिती अधिकारी यांना केलेल्या अनेक माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती व्यापक, विस्तृत स्वरूपाची आहे.

३. अर्जदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीचा वापर करताना कलम १९(३) अन्वये सादर केलेल्या द्वितीय अपिलां बरोबर आयोगाकडे अनेक प्राधिकरणाविरुद्ध वेगवेगळ्या कारणास्तव कलम १८ अंतर्गत तक्रारीही दाखल केल्या आहेत. तसेच काही प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचे कडे माहिती अर्जाद्वारे विस्तृत व अवाजवी स्वरूपाच्या माहितीची मागणी करून त्यास प्राप्त होणाऱ्या प्रतिसादाविरुद्ध कलम १८ अंतर्गत केलेल्या थेट तक्रार अर्जाच्या माध्यमातून दंडात्मक कारवाईची मागणी केली आहे.

४. अर्जदार यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे कलम १८ अंतर्गत दाखल केलेल्या तक्रारी बरोबर वेगवेगळ्या प्राधिकरणाविरुद्ध या अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये मोठ्या संख्येने द्वितीय अपीले दाखल केली आहेत. आयोगाने या द्वितीय अपीलासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुनावणी आयोजित करून साकल्याने निर्णय दिला असल्याने अर्जदार यांनी कलम १८ अंतर्गत दाखल केलेल्या तक्रारीसंदर्भात निर्णयाप्रत येण्यापूर्वी त्या निर्णय प्रक्रियेतील खाली नमूद केलेल्या सर्व बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

५. अर्जदार यांनी आयोगाकडे कलम १९ (३) अन्वये दाखल केलेल्या २१३ द्वितीय अपीलांच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाने दिनांक- १२.१२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित केली होती. या सुनावणीत अर्जदार यांना लेखी स्वरूपात सूचना पाठवून त्यांच्या द्वितीय अपीलासंदर्भात आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिली आहे.

६. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्यातील तरतुदींचा वापर करून वेगवेगळ्या प्राधिकरणाकडे मोठ्या प्रमाणात माहिती अर्ज, प्रथम अपील व त्या अनुषंगाने द्वितीय अपील सादर करून विस्तृत स्वरूपाची माहिती मागवण्यामागे अर्जदार याना कोणते सार्वजनिक हित साध्य करावयाचे आहे या बाबत सुनावणीमध्ये अर्जदार यांना विचारणा करून त्यांना याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुरेसा वेळ व वाजवी संधी दिली होती तथापि याबाबत अर्जदार आयोगासमोर कोणतीही लेखी अथवा तोंडी समर्थनीय कारणमीमांसा सादर करू शकले नाहीत. अर्जदार याबाबत कोणतेही समर्थनीय कारण देऊ शकले नसल्याने आयोगाने त्यांच्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचा अवलंब करून वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे सातत्याने केलेले माहिती अर्ज, प्रथम अपील व त्यासंदर्भात आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल करण्याची कार्यपद्धती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या प्रस्तावनेतील तत्वे, केंद्रीय माहिती आयोग, उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालय यांनी या यासंदर्भात दिलेल्या वेगवेगळ्या न्याय्य निर्णयाच्या कसोटीवर तपशीलवार तपासण्यात आली.

७. या तपासणीत अर्जदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींनुसार नागरिक म्हणून प्राप्त अधिकाराचा वापर करताना हेतूतः अवलंबलेली कार्यपद्धती कोणत्याही दृष्टीने या अधिनियमाच्या प्रस्तावनेत नमूद तत्वाशी सुसंगत नसल्याने आणि यामध्ये कोणतेही व्यापक जनहित समाविष्ट नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आल्याने या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून अर्जदार यांची २१३ द्वितीय अपीले निकाली काढण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.

अर्जदार यांनी सादर केलेल्या कलम १८ अंतर्गत च्या तक्रारीमध्ये त्यांचे म्हणणे सविस्तरपणे नमूद केले आहे, वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार यांच्या द्वितीय अपील प्रकरणी आयोगाने केलेली कार्यवाही या बाबी विचारात घेऊन अर्जदार यांनी कलम १८ अंतर्गत सादर केलेल्या तक्रारीची काळजीपूर्वक तपासणी करण्यात आली आणि या तपासणीअंती आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद तरतूदीनुसार अर्जदारास माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा या कायद्याचा मुख्य हेतु आहे. तथापि अर्जदार यांनी विपरीत भूमिका घेऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग करण्यासाठी सुनियोजित पद्धतीने जाणीवपूर्वक व्यापक व अतिविस्तृत स्वरूपाच्या माहितीची मागणी करण्यासाठी मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपीले व त्यानुषंगाने मोठ्या संख्येने आयोगाकडे द्वितीय अपीले व कलम १८ अंतर्गत तक्रारी सादर केल्या आहेत.

२) अर्जदार यांनी कलम १९(३) अंतर्गत दाखल केलेल्या द्वितीय अपीलांप्रमाणे त्यांनी कलम १८ अंतर्गत दाखल केलेल्या तक्रारींचीही तपासणी केली असता त्यामध्येही कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नाही. अर्जदार यांच्या वारंवार माहिती अर्ज, प्रथम अपील, द्वितीय अपील आणि कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करण्याच्या एकसारख्या कार्यपद्धतीमुळे अनेक प्राधिकरणांच्या कामकाजावर अनावश्यक बोजा पडत आहे.

३) अर्जदार यांनी वेगवेगळ्या प्राधिकरणाविरुद्ध केलेल्या द्वितीय अपिलांच्या तुलनेत या तक्रारींची संख्या कमी असली तरी या तक्रारी दाखल करण्यामागची तक्रारदार यांची भूमिका व्यापक जनहित साधणारी नसून कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपीले दाखल करण्यामागच्या त्याच्या मूळ हेतुमध्ये कोणताही बदल न करता या अधिनियमातील अन्य तरतुदीच्या आधारे प्राप्त अधिकाराचा वापर करून हेतुतः अवलंबलेल्या कार्यपद्धतीचे विस्तारीकरण केले असल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा माफक पध्दतीने वापर करणे आवश्यक असूनही त्यांनी माहिती अधिकार कायद्याचा जाणीवपूर्वक अनिर्बंध व अवाजवी दुरुपयोग केला आहे.

४) अर्जदार यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा अनिर्बंध व अवाजवी वापर केला असल्याने संबंधित शासकीय कार्यालयाचा बहुमुल्य वेळ, साधनसामग्री व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पड्डुन सदर शासकीय कार्यालयांकडून सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या दैनंदिन शासकीय कामकाजावर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झाला आहे

५) अशा मोठ्या प्रमाणावर तक्रार अर्ज करण्याच्या कार्यपद्धती मुळे गरजू अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीस गतीरोध निर्माण होत आहे. त्याचा निश्चितपणे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे. उपरोक्त सर्व बाबी तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व मा. केंद्रीय माहिती आयोगाकडील अशा प्रकरणी वेळोवेळी दिलेले, ऐतिहासिक, क्रांतीकारी व लक्ष्यवेधी निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होत आहे व संबंधित शासकीय खात्यांचा / प्राधिकरणांचा बहुमूल्य वेळ वाया जात असल्याचे दिसून येते. ही बाब माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झाले आहे.

६) अर्जदार यांनी कलम १८ अंतर्गत दाखल केलेल्या तक्रारींमध्ये त्यांनी कलम १९ (३) अन्वये दाखल केलेल्या द्वितीय अपीलांप्रमाणे कोणतेही तथ्य किंवा गुणवत्ता आढळून आली नाही व त्यातून कोणतेही जनहित साध्य होत नसल्यामुळे, अर्जदार यांनी दाखल केलेल्या तक्रारी कोणत्याही निर्देशाविना फेटाळण्यास पात्र आहेत या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. या सर्व तक्रार प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहेत.

## आदेश

अर्जदार यांचे २३ तक्रार अर्ज विनाकार्यवाही निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ, पुणे

जावक क्रमांक: तक्रार क्रमांक: 9068/2025

दिनांक: 26/8/2025

| तक्रारदाराचे नाव | | | | विकास भिमराव गायकवाड | |
|---|---|---|---|---|---|
| अनु. क्रमांक | तक्रार क्रमांक | वर्ष | संबंधित जिल्हा | जन माहिती अधिकारी पदनाम | जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय |
| 1 | 396 | 2023 | पुणे | वन परिक्षेत्र अधिकारी | वनपरिक्षेत्र कार्यालय इंदापूर, ता. इंदापूर, जि.पुणे |
| 2 | 592 | 2023 | पुणे | नायब तहसीलदार | इंदापूर तहसील कार्यालय, ता. इंदापूर, जि. पुणे |
| 3 | 586 | 2023 | पुणे | ग्रामसेवक | ग्रामपंचायत बावडा, ता. इंदापूर, जि.पुणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 286 | 2023 | पुणे | वनपरिक्षेत्र अधिकारी | पुणे (रं नं.३५ व ३७), इंदापूर, जि.पुणे |
| 5 | 392 | 2023 | पुणे | वनपरिक्षेत्र अधिकारी | पुणे (रं नं.३५ व ३७), इंदापूर, जि.पुणे |
| 6 | 397 | 2023 | पुणे | उपकार्यकारी अभियंता | खडकवासला पाटबंधारे विभाग सिंचन भवन पुणे |
| 7 | 585 | 2023 | पुणे | सहा प्रशासन अधिकारी | सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद पुणे |
| 8 | 401 | 2023 | पुणे | सहा. जिल्हा जलसंधारण अधिकारी | जलसंधारण विभाग, सोलापूर, उजनीनगर, मु.जि. सोलापूर-४१३ ००३ |
| 9 | 584 | 2023 | पुणे | ग्रामविकास अधिकारी | वडापुरी ग्रामपंचायत, ता. इंदापूर, जि.पुणे |
| 10 | 594 | 2023 | पुणे | कनिष्ठ सहा. | ए.बा.वि.से.यो.प्रकल्प इंदापूर ग्रामिण -2 |
| 11 | 593 | 2023 | पुणे | सहाय्यक मुख्य अभियंता (पा. व प्र.) | जलसंपदा विभाग, पुणे-११ |
| 12 | 591 | 2023 | पुणे | उपकार्यकारी अभियंता | सा.बां. (द) विभाग पुणे. |
| 13 | 398 | 2023 | पुणे | उप अभियंता | जि.प. बांधकाम उपविभाग इंदापूर, पंचायत समिती इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे |
| 14 | 403 | 2023 | पुणे | उप कार्यकारी अभियंता | सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जि. सोलापूर |
| 15 | 394 | 2023 | पुणे | शाखा अभियंता | सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे |
| 16 | 399 | 2023 | पुणे | उपकार्यकारी अभियंता | कार्यकारी अभियंता, सोलापूर (सा.बां.) विभाग, सोलापूर |
| 17 | 395 | 2023 | पुणे | उप अभियंता | लघु पाटबंधारे, उपविभाग पंचायत समिती इंदापूर, जि.पुणे |
| 18 | 393 | 2023 | पुणे | वन परिक्षेत्र अधिकारी | वनपरिक्षेत्र कार्यालय बारामती, ता. बारामती, जि.पुणे |
| 19 | 402 | 2023 | पुणे | उपकार्यकारी अभियंता | सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर जि. सोलापूर |
| 20 | 590 | 2023 | पुणे | उप अभियंता | पंचायत समिती इंदापूर, ता. इंदापुर, जि. पुणे |
| 21 | 589 | 2023 | पुणे | ग्रामसेवक | वडापुरी ग्रामपंचायत, ता.इंदापूर, जि.पुणे |
| 22 | 588 | 2023 | पुणे | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | समाजकल्याण विभाग, जि.प.पुणे |
| 23 | 587 | 2023 | पुणे | १) उप विभागीय जलसंधारण अधिकारी. २) उप जिल्हा जलसंधारण अधिकारी | 1) जिल्हा परिषद उपविभाग (ल पा,) पं.स. इंदापुर, ता. इंदापुर, पुणे. 2)जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, पुणे |

**********

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ